# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.**
**दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)**
**फॅक्स : २२८२१२६९.**
**ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in**
**वेब पत्ता : mahamjp.com**


## परिपत्रक

**विषय** - गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकामार्फत तपासणी करण्यात आलेल्या योजनांची पुर्व परवानगी न घेता तपासणी न करणेबाबत.

**संदर्भ** - कार्यालयीन आदेश क्र.मजीप्रा/गुपप/३३१/२०१५ दि. ७ ऑक्टोंबर,२०१५

संदर्भांकित कार्यालयीन आदेशानुसार **गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक (Quality Audit & Vigilance Unit)** हे कार्यालय, मा.सदस्य सचिव,म.जी.प्रा.,मुंबई यांच्या थेट नियंत्रणाखाली कार्यरत आहे. गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाचे कामकाजाचे कार्यप्रणाली व व्याप्तीबाबतच्या मार्गदर्शक सुचना सदरच्या कार्यालयीन आदेशाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकामार्फत, म.जी.प्रा.मार्फत राबविल्या जाणा-या सर्व ग्रामिण तसेच नागरी योजनांच्या कामाचे टप्पानिहाय व मंजूर कृती आराखडयानुसार गुणवत्ता परीक्षण करणे; मा.मंत्री महोदय(पा.पु.व स्व.),मा.प्रधान सचिव(पा.पु.व स्व.वि.), मा.लोक आयुक्त तसेच या कार्यालयामार्फत निर्देशित केल्यानुसार तक्रारीच्या अनुषंगाने योजनांच्या कामांची तपासणी करणे; राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रम तसेच शासनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत स्थानिक संस्थाव्दारे (जि.प./ग्रामपंचायत) राबविण्यात येणा-या ग्रामिण पाणी पुरवठा योजनांची त्रयस्थ यंत्रणा तपासणी करणे; शासनाच्या विविध कार्यक्रम/अभियानांतर्गत नागरी स्थानिक संस्थाव्दारे राबविण्यात येणा-या पाणी पुरवठा तसेच भुयारी गटार योजनांची मागणीनुसार त्रयस्थ यंत्रणा तपासणी करणे; इत्यादी बाबतची तपासणी केली जाते. सदरचे तपासणी अहवाल आवश्यकतेनुसार मा.मंत्री महोदय(पा.पु.व स्व.),मा.प्रधान सचिव(पा.पु.व स्व.),अधीक्षक अभियंता (गुपवदप) व या कार्यालयामार्फत अंतिम केले जातात.

तथापि, असे निदर्शनास आले आहे कि, म.जी.प्रा.चे काही प्रादेशिक / मंडळ कार्यालयामार्फत, या कार्यालयाची पुर्वपरवानगी न घेता परस्पर त्यांचे स्तरावर गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाने

तपासणी केलेल्या योजनांची पुन्हा तपासणी करणेबाबत त्यांचे अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता यांना आदेश दिलेले आहेत. सदरची बाब गंभीर स्वरुपाची आहे.

वरील बाबींचा विचार करुन, सर्व मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांना सुचना देण्यात येतात की, या कार्यालयाची पुर्व परवानगी न घेता या कार्यालयाचे नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकामार्फत तपासणी करण्यात आलेल्या योजनांची पुन्हा तपासणी करण्यात येऊ नये. सदर बाबींकडे दुर्लक्ष झाल्यास त्यास सर्व संबंधित अधिकारी जबाबदार राहतील.

**(संतोष कुमार)**
**सदस्य सचिव**

जा.क्र.मजीप्रा/गुपवदप/तांशा/परिपत्रक/ ३७८ /२०१५ दिनांक - ७, नोव्हेंबर,२०१५

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

- मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग (सर्व )
- मुख्य प्रशासकिय अधिकारी, मजीप्रा,एक्सप्रेस टॉवर्स,नरीमन पॉईन्ट, मुंबई
- अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ (सर्व )
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग (सर्व )
- कार्यकारी अभियंता, गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक, मजीप्रा,पुणे/औरंगाबाद/ नागपूर
- संबंधित नस्ती, गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक, मजीप्रा,ठाणे.